# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) हद्दीत महाजनवाडी येथे इंडस्ट्रीयल झोनमध्ये रहिवाशी संकुल उभारण्याबाबत

**(१) १०३३७ (०८-०३-२०१५). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील हद्दीत जुना सर्वे नं.९७, १८८, ९५ मौजे महाजनवाडी येथे इंडस्ट्रीयल झोनमध्ये रहिवाशी संकुलाची सन २०१२ मध्ये एम.एम.आर.डी.ए. मार्फत परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंडस्ट्रीयल झोनमध्ये एमएमआरडीएमार्फत चार एफएसआयची परवानगी देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, त्या संकुलामध्ये मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील ॲम्युनिट ओपन स्पेस राखीव ठेवली आहे काय, एकूण किती क्षेत्र ठेवले आहे व त्यातील क्षेत्र महानगरपालिकेने ताब्यात घेतले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) होय.

(२) ठाणे जिल्हयातील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जूना स.क्र. ९४, ९६, ९७, १८८ मौजे महाजनवाडी येथील इंडस्ट्रीयल झोनमधील जागेला मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने भाडे तत्वावरील घरे योजनेअंतर्गत दिनांक २६/६/२००९ रोजी लोकेशन क्लिअरन्स दिला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकास नियंत्रण नियमावलीतील तदतुदीनुसार औद्योगिक वापराच्या जागेचे रहिवासी वापरासाठी रुपांतर करुन बांधकाम परवानगी दिलेली आहे. भाडे तत्वारील घरे योजनेअंतर्गत दिलेली आहे. भाडे तत्वावरील घरे योजनेअंतर्गत ४.०० एफ.एस.आय. अनुज्ञेय असून त्यानुसार परवानगी देण्यात आली आहे.

(३) सदर योजनेमध्ये नागरी सुविधा भूखंड क्षेत्र १०५१० चौ.मी. दर्शविले असून, सदरचे क्षेत्र महानगपालिकेस दिनांक ९/६/२०१६ रोजी हस्तांतरीत झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना शहरात पोलीस दलातील कर्मचाऱ्यांने मद्यधुंद अवस्थेत केलेल्या गैरप्रकाराबाबत**

**(२) ३८६८० (२१-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना (जि.जालना) शहरात पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्याने दिनांक १३ नोव्हेंबर, २०१५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत शहरातील मध्यवस्तीत असलेल्या पेट्रोलपंपावर गोंधळ घालत पेट्रोलपंपाची नासधूस केली व परिसरात दगडफेक करुन तणाव निर्माण केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

सदर प्रकरणी वृत्तपत्रामध्ये छापून आलेल्या बातमीच्या आधारे पो.कॉ.एच.डी. घोरपडे यांना प्रथम दर्शनी दोषी धरून दिनांक १८/११/२०१५ रोजी निलंबित करण्यात आले होते व त्यांच्याविरूध्द खात्या अंतर्गत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी नमूद पोलीस कर्मचाऱ्याने पेट्रोल पंपावर दारू पिवून धिंगाना घातला नसल्याचे किंवा पेट्रोलपंपाची नासधूस केली नसल्याचे खात्याअंतर्गत प्राथमिक चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईतील वाहन संख्येवर नियंत्रण आणण्याबाबत**

**(३) ४२२४५ (२८-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत २५ लाखापेक्षा अधिक वाहने धावत असल्याने दिवसाला ४०० ते ५०० नविन वाहनांची भर पडत असून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकामुळे सध्या रस्ते अपघात, ही मोठी समस्या बनली असून माहे जानेवारी ते जुलै, २०१५ या कालावधीत १२ हजार ९९५४ रस्ते अपघात होऊन त्यामध्ये २९१ लोकांना प्राण गमवावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अपघात कमी करण्याच्या दृष्टीने तसेच वाहन संख्येवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७)** :(१) मुंबई शहरातील चार प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत एकूण २५,७४,२०४ इतक्या वाहनांची अभिलेखावर नोंद झालेली आहे. तर सन २०१४-२०१५ या वर्षात एकूण २,१४,२५१ इतक्या वाहनांची अभिलेखावर नोंद झालेली असून एका दिवसाला सरासरी ५९७ वाहनांची नोंदणी झाल्याचे दिसून येते.

मुंबई शहरामध्ये माहे जानेवारी ते जुलै, २०१५ या कालावधीत एकूण १३,०१३ रस्ते अपघात झाले असून त्यामध्ये ३३५ लोकांना प्राण गमवावे लागले आहेत.

सदर अपघात हे पादचाऱ्यांच्या चुकीमुळे, वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे व इतर कारणांमुळे झालेले आहेत.

(२) व (३) अपघात कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

i) अपघात कमी करण्यासाठी जंक्शनवर सकाळी व संध्यकाळी पिक अवर्समध्ये जास्तीत जास्त पोलीस मनुष्यबळ रिफलेक्टिव जॅकेट व एलईडी बॅटनसह ठेवण्यात येते.

ii) अपघातप्रवण क्षेत्र/मद्यप्राशन करुन वाहन चालवू नये/वाहन चालवितांना मोबाईलवर बोलू नये/हेल्मेटच्या वापर कराव/ओव्हरटेक करु नये अशाप्रकारचे फलक वाहनचालकांच्या जागृतीसाठी दर्शनी ठिकाणावर लावण्यात येतात.

iii) वाहनचालकांमध्ये वाहतुक नियमांबाबत जनजागृती व्हावी याकरीता रस्ता सुरक्षा सप्ताहावेळी शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून वाहतूक नियमांचे मोठमोठे पोस्टर्स तयार करुन जाणीव करुन देण्यात येते.

iv) रिक्षाचालक संघटना, टॅक्सीचालक संघटना, टेम्पोचालक संघटना यांच्या बैठका आयोजीत करुन वेळोवेळी त्यांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे त्यांच्या मनावर बिंबविण्यांत येते.

v) रस्ता सुरक्षा दल उपक्रमामध्ये सहभागी शाळेमधील विद्यार्थ्यांना योजनाबध्दरित्या वाहतूक नियंत्रण व नियमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

vi) रस्ता सुरक्षिततेचे प्रशिक्षण देण्याकरीता वाहतूक चिल्ड्रन पार्क ची निर्मिती करण्यात आलेली असून सदर पार्कास विद्यार्थी व पालक भेट देत असतात.

vii) वाहतूक प्रदर्शन फिरती वाहिनीच्या माध्यमातून २,६४४ विद्यार्थ्यांना व १४४ शिक्षक/पालकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

vii) शहरातील विविध महाविद्यालये व माध्यमिक शाळांमध्ये रस्ता सुरक्षा विषयावर व्याख्याने आयोजीत करण्यात येतात.

vii) वाहतुक नियमांचे उल्लंघन कारणाऱ्या वाहन चालकांविरुध्द मुंबई वाहतूक विभागामार्फत माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत मोटार वाहन कायद्यान्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| **अ.क्र.** | **नियमभंग प्रकार** | **केसेस** |
|---|---|---|
| १ | सिग्नल जंपींग | १,९४,४२० |
| २ | वेगाने वाहन चालविणे | ८,५६८ |
| ३ | हेल्मेट परिधान न करणे | ४,१४,६७० |

| | | |
|---|---|---|
| ४ | वाहन चालवितांना मोबाईलवर बोलणे | १५,२२१ |
| ५ | ड्रंक अँड ड्राईव्ह | १७,७२८ |
| ६ | मो.वा.का. अंतर्गत इतर कलमान्वये कारवाई | ९,१५६२६ |

ix) कसूरदार वाहनचालकांनी वाहतुक नियमभंगाचे गुन्हे करु नयेत याकरीता त्यांचे समुपदेशन करण्यात येते.

x) प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत अपघात कमी होण्याच्या दृष्टीने योग्यता प्रमाणपत्र जारी अथवा नुतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या वाहनांची नियमानुसार तपासणी करण्यात येते व तांत्रिकदृष्ट्या सक्षम वाहनांना योग्य प्रमाणपत्र जारी / नुतनीकरण करण्यात येते.

xi) वायुवेग पथक तसेच विशेष तपासणी पथकामार्फत धोकादायक स्थितीत चालणारी वाहने, धोकादायक रासायनिक पदार्थांची वाहतूक करणारी वाहने, क्षमतेपेक्षा जादा भार / प्रवासी वाहतून नेणारी वाहने इ. वर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई व विरार (जि.पालघर) येथील वाढते गुन्हे रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(४) ४९४१७ (२६-०६-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई व विरार (जि.पालघर) येथील वाढते गुन्हे रोखण्यासाठी अतिरीक्त पोलीस कर्मचारी, पोलीस श्वानपथक, बॉम्ब शोधक पथक, फिंगर प्रिंट तज्ञ इ. तसेच विरार पश्चिम, कण्हेर, नायगाव पूर्व, आचोळे, कामण तसेच मौजे मांडवी, मौजे पेल्हार या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनचा प्रस्ताव तसेच पोलीसांच्या निवासासाठी ५०० घरांची मागणी अपर पोलीस अधिक्षक, पालघर यांनी प्रस्तावाव्दारे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनास केली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनास याबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्ह्यातील वसई पोलीस उपविभागाचे विभाजन करुन विरार व नालासोपरा असे दोन स्वतंत्र पोलिस उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलीस कार्यालयाने दिनांक २७ जुलै, २०११ रोजीच्या पत्राने शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७)** :(१) वसई व विरार (जि.पालघर) येथील वाढते गुन्हे रोखण्यासाठी पोलीस श्वान पथक तसेच आचोळे, मांडवी व पेल्हार येथे पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महाराट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केला आहे.

(२) हे खरे आहे.
(३) राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत आचोळे व मांडवी ही दोन पोलीस ठाणी निर्माण करण्याची बाब प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्पयास वित्त विभागाची मंजूरी घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच गृह विभाग शासन निर्णय दिनांक २६.१२.२०१६ अन्वये पालघर जिल्ह्यातील वसई पोलीस उपविभागाचे विभाजन करुन विरार व नालासोपारा असे दोन स्वतंत्र पोलीस उपविभागीय कार्यालय निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यातील रकमेचा अपहार झाल्याबाबत**

**(५) ५१७९६ (२४-०५-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील अप्पर पोलीस कार्यालयातंर्गत येणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणा-या वेतन, भत्ते व इतर बिलांच्या रकमेतून माहे १६ ऑगस्ट, २०११ ते ११ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीमध्ये अधिका-यांच्या संगनमताने कर्मचा-यानी १८ लाख ४० हजार ७७९ रूपयांचा अपहार केल्याचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत वरिष्ठ अधिका-यांना माहिती मिळूनही अद्याप या प्रकरणाची चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर यांनी सोलापूर येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन, भत्ते व इतर बिलाच्या रकमेतून अपहार झालेला नाही असे कळविले आहे.

---

**मालेगाव महानगरपालिका (जि.नाशिक) क्षेत्रातील विकास कामांबाबत**

**(६) ५५२८३ (०९-०९-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक सोई सुविधांच्या विकास कामासाठी शासनाकडून प्राप्त विशेष अनुदानातील कामांची महानगरपालिका महासभेतील

पारीत ठरावानुसार कार्यवाही होण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सचिव (नवि-२) नगरविकास विभाग, मंत्रालय यांना दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय.

(२) मालेगाव महानगरपालिकेस सन २०१३-१४ करीता शासन निर्णय दिनांक १९ नोव्हेंबर,२०१३ अन्वये रु.४ कोटी मंजूर करण्यात आले होते. सदर निधीच्या खर्चाची मुदत संपुष्टात आली असून, वित्त विभागच्या दिनांक २५ ऑगस्ट,२०१५ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार हा निधी "अखर्चित" म्हणून गणला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पैठण (औरंगाबाद) नगरपालिकेला वैशिष्ट्यपूर्ण अनुदान योजनेतून प्राप्त झालेल्या निधीबाबत**

**(७) ५६९०२ (२६-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) नगरपालिकेला वैशिष्ट्यपूर्ण अनुदान योजनेतून सन २००१ मध्ये १ कोटी १० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून नगरपालिकेने एलईडी पथदिवे बसविण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी काढलेल्या निवेदेद्वारे ५ हजार रुपयांचा एलईडी दीवा २५ हजार रुपयास विकत घेतल्याची निविदा मंजूर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५ हजार रुपयांच्या एलईडी पथदिव्यांसाठी २५ हजार रुपये देण्याच्या निर्णयानुसार नगरपालिकेत ८० लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याने या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष यांनी माहे मे, २०१६ मध्ये जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीतील निष्कर्षानुसार दोषी असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड नगरपरिषदेचे (जि.पुणे) रेल्वे अंडर ब्रिज (RUB) चे काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ६०५१२ (३१-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने दौंड नगरपरिषदेस प्रस्तावित रेल्वे अंडर ब्रिज (RUB) चे कामासाठी रु.७ कोटी उपलब्ध करून दिले असुन सदर कामाची सन २०१३-१४ च्या दरसूचीनुसार अंदाजित किंमत १७ कोटी इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव दौंड नगरपरिषदेने दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनास सादर केला असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दौंड नगरपरिषदेस प्रस्तावित रेल्वे अंडर ब्रिज (RUB) चे कामासाठी उर्वरित १० कोटी रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालीकेचे करमणूक कर अनुदान अप्राप्त असल्याबाबत**

**(९) ६२४८८ (२६-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेला करमणूक कराचे अंदाजे १२.५० कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडुन अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ड श्रेणी महानगरपालीका असलेल्या अमरावती महानगरपालीका क्षेत्रातील विकासात्मक कामे रखडलेली असून ती पूर्ण करण्याचे दृष्टीने शासन स्तरावर सदर निधी वितरीत करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) करमणुक कर अभिहस्तांकीत रकमा उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार संबधीत महानगरपालिकांना मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) अमरावती महानगरपालिकेस विविध विकास कामांकरीता सन २०१६-१७ मध्ये मुलभुत सुविधांकरीता रु.२.९९ कोटी, रस्ता अनुदान रु.०.७५ कोटी व विशेष अनुदान रु.४५ कोटी असे एकूण रु.४६.७४ कोटी मंजुर करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिकेस मिळणारा जमीन महसुल व बिनशेतसारा अनुदान अप्राप्त असल्याबाबत**

**(१०) ६२४८९ (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती महानगरपालीकेस शासनाकडून जमीन महसूल व बिनशेतसारा अनुदानापोटी मिळणारी अंदाजे रुपये ८,७७,३९,५५५ इतकी रक्कम अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती महानगरपालीका क्षेत्रातील विकासात्मक कामे रखडली असून ती पूर्ण करण्याचे दृष्टीने सदर निधी वितरीत करण्याकरीता शासनाकडुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) जमीन महसुल व बिनशेतीसाऱ्याच्या अभिहस्तांकीत रकमा उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार संबधीत महानगरपालिकांना मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(२) अमरावती महानगरपालिकेस विविध विकास कामांकरीता सन २०१६-१७ मध्ये मुलभुत सुविधांकरीता रु.२.९९ कोटी, रस्ता अनुदान रु.०.७५ कोटी व विशेष अनुदान रु.४५ कोटी असे एकूण रु.४६.७४ कोटी मंजुर करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार शहर परिसरात नायजेरियन लोकांच्या वाढत्या वस्त्या व गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्याबाबत**

**(११) ६२७३४ (२३-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर परिसरात नायजेरियन लोकांच्या वाढत्या वस्त्या तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी कायदेशीर प्रतिबंधक उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी वसई विभागात नालासोपारा पोलीस ठाण्याचे अभिलेखवर सन- २०१४ साली ५९/१४ अशा प्रकारचा १ गुन्हा व सन २०१५ साली ०३/१५, ०४/१५, ०५/१५ तीन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सन २०१६ साली तुळींज पोलीस ठाणे येथे नायजेरीयन नागरिकांची माहिती न देता पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाड्याने ठेवणाऱ्या घर मालकावर प्रतिबंध उपाय म्हणून २१/१५, ०४/१६, १८/१६ असे तीन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे अर्नाळा पोलीस ठाणेत नायजेरीयन नागरिकांविरूध्द १८४/१५ भादंविस कलम ३५४ (ड) अन्वये एक गुन्हा दाखल करून आरोपीत यांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच विरार पोलीस ठाणे येथे प्रतिबंधक कारावाई म्हणून रूम मालक यांचे विरूध्द ०६/२०१७ अन्वये गुन्हा दाखल असून आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

पालघर जिल्ह्यात तसेच वसई-विरार परिसरात अनधिकृपणे वास्तव्यास असलेले नायजेरीयन नागरिकांकरिता विशेष शोध मोहिम राबविण्यात येते. सदर मोहिम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता विशेष पथकाची नेमणूक करून पोलीस ठाणे कार्यकक्षेतील नायजेरीयन नागरीकांची पासपोर्टची तपासणी केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली येथील शासकीय आयटीआय मध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या निदेशकांना वेतन देण्याबाबत**

**(१२) ६३०२० (३१-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील शासकीय आयटीआय मध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या निदेशकांना गत एक वर्षापासून मानधन मिळाले नसल्याने त्यांना आर्थिक त्रास सोसावा लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निदेशकांचे प्रलंबित असलेले मानधन तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-०७-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) तासिका तत्वावरील निदेशकांचे वेतन ज्या लेखाशिर्षाखाली अदा केले जाते, त्या लेखाशिर्षांतर्गत पुरेसे अनुदान प्राप्त न झाल्याने तासिका तत्वारील निदेशकांची काही महिन्यांची मानधने देयके प्रलंबित आहेत. सद्य:स्थितीत माहे मार्च ते मे, २०१७ या कालावधीतील मानधन संबंधितांना अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तासिका तत्वावरील निदेशकांचे मानधन तातडीने अदा करण्याच्या दृष्टीकोनातुन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून संचालक, लेखा व कोषागारे यांचेशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**ठाणे शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याबाबत**

**(१३) ६३८४७ (२४-०८-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शहरात सर्व्हिस रोड व इतर रस्त्यांवर खाजगी वाहने बेकायदेशीर पार्किंग केली जात असल्याने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे शहरातील होणारी वाहतूक कोंडी मुख्य रस्त्यालगत बेकायदेशीर ट्रक, टेम्पो, ट्रॉव्हल्स वाहने उभी राहत असल्याने होत असून नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१६ व त्या दरम्यान सदर बाब निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याची वेळोवेळी मागणी होऊनही कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय. याबाबत स्थानिक विधान सभा सदस्य, नगरसेविका तसेच इतर नागरीकांची निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(३), (४) व (५) नो पार्किंग क्षेत्रात तसेच वाहतूकीस अडथळा होईल अशा ठिकाणी पार्किंग करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांवर दैनंदिन कर्षित वाहनांद्वारे तसेच जॅमर लावून कायदेशीर कारवाई करण्यात येते. तसेच खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

i) ठाणे शहरातील वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी जड-अवजड वाहनांची वाहतूक ठराविक कालावधीत प्रतिबंधीत करुन त्यावर नियंत्रण आणण्यात आलेले आहे.

ii) मुख्य रस्त्यावर/चौकातील वाहतुकीच्या दृष्टीने गैरसोयीचे असलेली रिक्षा थांबे रद्द करुन, नागरीकांची सोय व सुरळीत वाहतूक व्यवस्था विचारात घेऊन लघु थांबा, मध्यम थांबा व मोठा थांबा याप्रमाणे वर्गीकरण करुन रिक्षा थांबे नियमित करण्यात आले आहेत.

iii) वाहनचालकांना पार्किंगची जागा उपलब्ध होण्याकरीता मुख्य रस्त्यांवर किमान एक तरी वाहनतळ उपलब्ध होईल या दृष्टीने सम-विषम पार्किंग, ठराविक वेळी पार्किंग व दुतर्फा पार्किंग याप्रमाणे पार्किंगची ठिकाणे नियमीत करण्यात आलेली आहेत.

iv) वाहतूक कोंडीच्या वेळी तातडीने मदत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आर.सी.मोबाईल नव्याने कार्यान्वित करण्यात आली आहे.

v) वाहतूक नियमन करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये (जंक्शन टू जंक्शन) थेट संवाद होण्यासाठी त्यांना वॉकीटॉकी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

vi) वाहतुकीचे सुयोग्य नियमन होण्याकरीता भायखळा येथील वाहतूक प्रशिक्षण संस्थेमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येत आहे तसेच त्यांना सेवाअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

vi) विविध कलमाअंतर्गत करण्यात आलेल्या केसेसची माहिती :

| वर्ष | दाखल केसेस | दंड / तडजोड शुल्क (रु.) |
|---|---|---|
| २०१४ | ५,८८,८२४ | ६,३२,००,७२५/- |
| २०१५ | ७,७६,६३८ | ८,४८,७४,७६०/- |
| २०१६ (ऑगस्ट पर्यंत) | ५,३९,३०० | ६,५२,६८,१००/- |

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील बुध्दिस्ट सर्किटसाठी निधी देण्याचा निर्णय**

**(१४) ६६३४८ (०७-०२-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षाभूमी, ड्रॅगन पॅलेस आणि चिंचोली भागाना जोडणाऱ्या नागपुरात प्रस्तावित असलेल्या बुध्दिस्ट सर्किट केंद्रासाठी १०० कोटीचा निधी देण्याचा निर्णय माहे सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) असा निर्णय झालेला नाही.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत**

**(१५) ६६८७६ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खंडाळा घाट (बोरघाट), खोपोली एक्झिट ते फूडमॉल कामशेत बोगदा ते उर्से टोलनाका परिसर, खालापूर टोल नाका ते पनवेल परिसर या परिसरात चोवीस तास ड्रोनरोरद्वरे नजर ठेऊन लेनची शिस्त मोडणाऱ्यांसह अतिवेगाने वाहन चालवणाऱ्या आणि चुकीच्या पध्दतीने ओव्हेरटेक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीअंती मुंबई पुणे द्रुतर्गती मार्गावरील नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत तसेच यामार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी व राज्यातील इतरही द्रुतगती महामार्गावर ड्रोन बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

i) द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी स्थानिक पोलीसांकडून दिवसा व रात्री पेट्रोलींग करण्यात येते तसेच वाहतुकीचे नियमन केले जाते. लेन कटींग करणाऱ्या व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

ii) वाहतुक कोंडी व अपघातांना प्रतिबंध व्हावा याकरीता वाहनचालकांना सूचित करण्यासाठी वेगमर्यादेचे फलक, विविध सूचनांचे फलक, दिशादर्शक फलक तसेच अपघातप्रवण ठिकाणी संरक्षीत वायररोप तसेच टोईंग क्रेन, पेट्रोलींग व्हॅन, चार कायमस्वरुपी रुग्णवाहिकेची सुविधा तसेच चार शिघ्र प्रतिसाद वाहनांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

iii) द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी दिनांक १०.०९.२०१६ पासून विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून महामार्गावर लेनकटींग करणारी वाहने, ओव्हरस्पिड वाहने, अनधिकृत पार्किंग केलेली वाहने इ. वाहनांवर नेमलेल्या स्पॉटरद्वारे वाहनांचे क्रमांक उर्से/कुसगांव/ खालापूर येथील टोलनाक्यावर नेमलेल्या पोलीसांना कळवून त्यांचेवर मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येते.

iv) द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुट्टीच्या दिवशी व गर्दीच्या वेळी सुरळीत ठेवण्यासाठी तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी खालापूर टोल प्लाझा ते उर्से टोल प्लाझा या दरम्यान तीन एक्सल, मल्टी एक्सल व ओडीसी वाहनांना पुढे नमूद केल्याप्रमाणे प्रवेशबंदी करण्यात आलेली आहे. सदर मोहिमअंतर्गत वाहतुक कोंडीस पुर्णत: आळा बसलेला आहे.

**मुंबई-पुणे वाहिनी -**

शुक्रवारी संध्याकाळी किंवा दोन किंवा अधिक सुट्ट्या सुरु होण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी १७.०० ते २०.०० वा.

शनिवारी सकाळी किंवा दोन किंवा अधिक सुट्ट्या सुरु होण्याच्या दिवशी सकाळी ०८.०० ते १२.०० वा.

**ठिकाण -** खालापूर टोल नाका व द्रुतगती मार्गावर रा.म. ०४ ला जोडणारा मार्ग

**पुणे-मुंबई वाहिनी -**

रविवारी संध्याकाळी किंवा सुट्ट्या समाप्त होण्याच्या शेवटच्या दिवशीच्या संध्याकाळी १६.०० ते २०.०० वा.

सोमवारी सकाळी किंवा सुट्ट्यानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिनाच्या सकाळी ०६.०० ते ९.०० वा.

**ठिकाण -** कुसगांव येथे रा.म.०४ वर व उर्से येथे द्रुतगती मार्गावर डाव्य बाजूला.

राज्यातील इतर द्रुतगती मार्गावर ड्रोन बसविण्याचा प्रस्ताव अद्याप नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पूर्व (जि.ठाणे) येथील नांदिवली, चक्कीनाका, पत्रीपूल या विभागाकरिता नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत**

**(१६) ६७४२८ (१७-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पूर्व (जि.ठाणे) येथे गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून नांदिवली, चक्कीनाका, पत्रीपूल या विभागाकरिता नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पूर्वेतील गणेशवाडी परिसरातील उपलब्ध जागेवर पोलीस स्टेशन सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागाकरिता पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या कार्यक्षोमधील परिमंडळ-२, कल्याण अंतर्गत कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे क्षेत्रफळ हे १३ कि.मी. असून सन २०११ च्या जनगणनेनुसार कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीमधील लोकसंख्या सुमारे ३,५०,००० इतकी आहे. कोळसेवाडी पोलीस ठाण्यालगत पुर्वेस विठ्ठलवाडी पोलीस ठाणे, उत्तरेस महात्मा फुले चौक पोलीस ठाणे व दक्षिणेस हिललाईन पोलीस ठाणे अशी चर्तुसिमा आहे. यास्तव सद्य:स्थितीत कल्याण पुर्व (जि.ठाणे) येथील नांदिवली, चक्कीनाका, पत्रीपुल या विभागाकरीता नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता वाटत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडबंदर (जि.ठाणे) महामार्गावरील सतत होणारी वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याबाबत**

**(१७) ६७७२० (१६-१२-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) मार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे या मार्गावर रहदारी करणाऱ्या जनतेला नेहमीच त्रासाला सामोरे जावे लागत असून येथील नोकरदार वर्गाला, शाळेत

जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी कंटेनरचा अपघात, क्रेन बंद पडणे, वाहनांमध्ये बिघाड आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गावरील सतत होणारी वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

वर्सोवा खाडीवरील जुना पूल दुरुस्तीच्या कामानिमित्त बंद करण्यात आल्याने घोडबंदर मार्गावरील वाहतूक वाढल्याचे आढळून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) घोडबंदर मार्ग हा राज्य मार्ग क्रमांक ८ व ३ ला जोडणारा मुख्य वाहतुकीचा मार्ग असून या मार्गावर चार ठिकाणी उड्डाणपूल आहेत. या मार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महत्वाचे चौक / नाक्यावर दिवसा व रात्रौ पोलीस कर्मचारी नेमण्यात येतात.

गायमुख जकात नाका भागातील रस्ता अरुंद व चढणीचा असल्याने एखाद्यावेळी जड-अवजड वाहन बंद पडल्यास वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. बंद पडलेली वाहने तातडीने बाजूस घेण्यासाठी क्रेन उपलब्ध ठेवण्यात आलेली आहे. प्रसंगी हायड्रा क्रेनची आवश्यकता भासल्यास खाजगी क्रेनमालकांशी संपर्क साधून बंद वाहने बाजूस घेण्याची कारवाई करण्यात येते.

शहराअंतर्गत भागात वाहतूक सुनिश्चित होण्यासाठी दिनांक १२.०८.२०१६ अन्वये अधिसूचना जारी करण्यात आली असून अवजड मालवाहनांना सकाळी व संध्याकाळी गर्दीच्या वेळेत वाहतुकीस मनाई करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर महामार्गावर जंक्शनच्या ठिकाणी व गस्तीकरीता कर्मचारी नेमून वाहतुक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य व संस्थां चालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(१८) ७०४६४ (३०-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वसंतदादा पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य राजेंद्र सावंत, अध्यक्षा आशा लता फाळके आणि कॉलेजचे सचिव अप्पासाहेब देसाई यांच्यावर तंत्रशिक्षण संचालयाने वडाळा ट्रक टर्मिनल पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॉलेजचे प्राचार्य व संस्थांचालकांवर तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदरहू प्रकरणात यापूर्वीचे दोन्ही गुन्हयातील दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले असुन सन २०१६ मध्ये दाखल गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुर्तीजापूर (जि. अकोला) येथे एका ६ वर्षाच्या मुलीवर करण्यात आलेला बलात्कार**

**(१९) ७३९०४ (२०-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तीजापूर (जि. अकोला) येथे एका ६ वर्षाच्या मुलीवर दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी बलात्कार करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बलात्काराचा गुन्हा नोंदविण्यासाठी एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांसह पीडीत मुलीचे आई-वडील मुर्तीजापूर पोलिस स्टेशन येथे गेले असता तेथील पोलिसांनी त्यांचा रिपोर्ट नोंदवून घेण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, बलात्कार करणाऱ्या व्यक्तीविरुध्द तसेच गुन्हा नोंदवून न घेणाऱ्या पोलिसांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७)** :(१) होय.
(२) हे खरे नाही.
दि.१.१२.२०१६ रोजी पिडीत मुलगी तीचे आई-वडीलांसोबत पोलीस स्टेशनला आल्यावर तात्काळ पिडीत मुलीचे आईची तक्रार घेवून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर प्रकरणी दि.१.१२.२०१६ रोजी पोलीस स्टेशन मुर्तीजापूर शहर येथे पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द अप.क्र.३०१/२०१६ कलम ३७६(२) आय, ३५४अ, ५०६ भादंवि सह कलम ४, ८ पोक्सो कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, मा.न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला एमआयडीसी पोलीस स्टेशन येथील आरोपीने आत्महत्या केल्याबाबत**

**(२०) ७४१६० (२१-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला एमआयडीसी पोलीस स्टेशन येथील पोलीस कोठडीमध्ये चेतन मनतकार ह्या आरोपीचा पोलीस ठाण्याच्या आवारात तयार केलेल्या हरबऱ्याच्या शेतीकरिता आणलेले किटकनाशक प्राशन केल्याने मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस ठाण्याच्या आवारात शेती करण्याकरीता गृह विभागाकडून परवानगी घेण्यात आली होती काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पोलीस कोठडीत सुरक्षा कर्तव्यावर असणाऱ्या बेजबाबदार पोलीस अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) पोलीस अधीक्षक अकोला, यांनी पोलीस कोठडी सुरक्षा कर्तव्यावर असणा-या ३ पोलीस कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असुन सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.यांचे पोलीस नियंत्रण कक्ष, अकोला येथे तात्काळ स्थानांतरण करण्यात आले आहे.

उपरोक्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची प्राथमिक चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, मुर्तीजापुर हे करित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कचांड-गो-हे (ता.वाडा, जि.ठाणे) मार्गावरील एनर्जी सिस्टिम लिमिटेड या कंपनीतील कामगारांचे थकित वेतन देण्याबाबत**

**(२१) ७४२४० (२०-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कचांड-गो-हे (ता.वाडा, जि.ठाणे) मार्गावरील, एनर्जी सिस्टिम लिमिटेड या कंपनीतील सुमारे १ हजार कामगारांना अद्याप थकित वेतन देण्यात आले नसल्याचे दिनांक ०७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत हस्तक्षेप करून कंपनी व्यवस्थापन व कामगार यांची बैठक घेवून सदरहू समस्या तातडीने सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही, कारण मे, एनर्जी सिस्टम लिमिटेड ही आस्थापना कचांडगो-हे, ता.वाडा, जि,ठाणे या पत्यावर अस्तित्वात नसून, त्याऐवजी मे.बील एनर्जी सिस्टिम लि. ही आस्थापना सदर पत्यावर कार्यरत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मु.पो.ता.रोहा (जि.रायगड) येथील उपभूमी अभिलेख अधिकारी यांना लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याबाबत**

**(२२) ७४३१६ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.रोहा (जि.रायगड) येथील उपभूमी अभिलेख अधिकारी श्री.अरविंद झिराडकर यांनी ३५००० रुपयांची लाच घेताना रायगड लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन आरोपीच्या घराची व मालमत्तेची झडती व तपासणी रायगड लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे काय, असल्यास, झडतीमध्ये ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त अशी किती संपत्ती आढळून आली असून त्याचा पंचनामा करण्यात आला आहे काय तसेच चौकशीच्या अनुषंगाने आरोपीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७)** :(१) होय.

आरोपी लोकसेवक श्री.अरविंद झिराडकर, उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी खाजगी इसमामार्फत ३५,०००/- रुपयांची लाच स्विकारल्याने रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी त्यांना अटक केली असून त्यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार रोहा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १०/२०१७ दाखल करण्यात आला आहे तसेच त्यांना दि.२४.०१.२०१७ पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.अरविंद झिराडकर, उपभुमी अभिलेख अधिकारी यांच्या मौजे झिराड येथील घराची घरझडती घेण्यात आली असून घरझडतीत आक्षेपार्ह मालमत्ता आढळुन आलेली नाही.

---

## अकोला (जि.अकोला) जिल्हा क्रीडा संकुल येथे अल्पवयीन खेळाडूंचे लैंगिक शोषण करण्यात आल्याबाबत

**(२३) ७४४११ (२०-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) जिल्हा क्रीडा संकुल येथे जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षकाकडून अल्पवयीन खेळाडूंवर लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षकावर स्थानिक रामदासपेठ पोलीस स्टेशन मध्ये पास्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी, शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशी दरम्यान काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्यात अशा विकृत घटनांची पुनरावृत्ती न होण्याकरिता शासनाकडून कोणती उपाय योजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) फिर्यादी पिडीत मुलाने दि.१३.१२.२०१६ रोजी दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन आरोपी जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षकावर पोलीस स्टेशन रामदासपेठ येथे अप.क्र.३३८/२०१६ कलम ३७७, ५०६ भादंवि सह कलम ५(एल) (ओ) (पी), ६, ९ (एल) (ओ) (पी), ८, १०, १२ पोक्सो कायदा प्रमाणे दि.१३.१२.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आणखीन एका फिर्यादी पिडीत मुलाने दि.२०.१२.२०१६ रोजी दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन रामदासपेठ येथे अप.क्र.३४४/२०१६ कलम ३७७, ५०६ भादंवि सह कलम ५(एल) (ओ) (पी), ६, ९ (एल) (ओ) (पी), ८, १०, १२ पोक्सो कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील भिलवडी येथील तासगांव चोपडे मळ्याजवळ १४ वर्षीय शाळकरी मुलीचा अत्याचार करुन करण्यात आलेला खून

**(२४) ७४८७८ (२१-०४-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप**

**नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील भिलवडी येथील तासगांव चोपडे मळ्याजवळ १४ वर्षीय शाळकरी मुलीचा अत्याचार करुन खून केल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आरोपीचा तपास करुन त्याच्यावर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :**(१) होय.

(२) सदर घटनेबाबत तपास करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीविरुध्द भिलवडी पोलीस ठाणे भाग ५ गु.रजि.नं.२/२०१७ भादंवि कलम ३०२, ३७६(अ) सह पोक्सो कायदा कलम ४, ६, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी क्र.१ हा संशयीत आरोपी असून, त्याचेविरुध्द पुरावे प्राप्त न झालेने त्यास सी.आर.पी.सी. कलम १६९ प्रमाणे मुक्त करण्याबाबतचा अहवाल मा.न्यायालयात पाठविण्यात आला आहे. आरोपी क्र.२ चे डीएनए मयताच्या डीएनए शी जूळत असल्याबाबत वैद्यकीय अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच पुरावे मिळाले आहेत. आरोपी क्र.२ यास अटक करण्यात आले असून, गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आयटीआय शिक्षकांच्या मागण्यांबाबत**

**(२५) ७५८२० (२१-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील आयटीआयमध्ये शिक्षकांच्या ३०% जागा रिक्त असून त्या भरण्याबाबत व इतर प्रलंबित मागण्यासाठी राज्यातील आयटीआयच्या शिक्षकांनी हिवाळी अधिवेशनात मूक मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४ मध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत रिक्त असलेली सरळसेवेची गट क संवर्गातील ७०२ पदे भरण्याबाबत जाहिरात दिली होती. त्यामध्ये २८० शिक्षकीय पदांचा समावेश आहे. त्या अनुषंगाने लेखी व व्यावसायिक चाचणी परीक्षा घेण्यांत

आली होती. परंतु, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार जाहिरात रद्द झाली होती. सदर निर्णयाविरुध्द संचालनालयामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटिशन दाखल करण्यात आली. मा.न्यायालयाच्या दि.२३.११.२०१६ चे अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने जाहिरातीतील शिल्प निदेशक पदे वगळून गणित निदेशक, चित्रकला निदेशक, भांडार अधिक्षक, सहाय्यक भांडारपाल/भांडार लिपिक, लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुटंकलेखक (मराठी), वाहन चालक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक ही पदे भरण्याकरिता पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य आय.टी.आय निदेशक संघटनेच्या विविध मागण्यासंदर्भात दिनांक ०४.०१.२०१७ रोजी मा. राज्यमंत्री (कौ.वि. व उ.) यांचे अध्यक्षतेखाली बैठक झालेली आहे. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आय.टी.आय. निदेशक संघटनेच्या मागण्यासंदर्भात नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वातंत्र्य संग्राम सैनिकांना कमी पेन्शन मिळत असल्याबाबत**

**(२६) ७६०१३ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ दरम्यान स्वातंत्र्य संग्राम सैनिकांची पेन्शन वाढविण्याबाबत घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यांच्या तुलनेत राज्यातील स्वातंत्र्य संग्राम सैनिकांना कमी पेन्शन मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेन्शन वाढवून मिळण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पेन्शन वाढविण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१७) :**(१) होय. केंद्र शासनाने दिनांक १७.८.२०१६ रोजी स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन वाढीबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

(२) याबाबतची माहिती कक्षामध्ये उपलब्ध नाही. तथापि, केंद्र शासनापेक्षा राज्य शासनाच्या स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन म्हणून मिळणारी रक्कम कमी आहे.

(३) होय, पेन्शन वाढवून मिळण्याबाबतची निवेदने शासनास प्राप्त होत आहेत.

(४) राज्यातील स्वातंत्र्य संग्राम सैनिकांना देण्यात येणा-या पेन्शनच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हिंगणी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील घोडनदीतून वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(२७) ७६६२३ (२१-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिंगणी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील घोडनदीतून वाळू उपसा विरोधात कारवाई करण्यास गेलेल्या प्रांताधिकारी यांच्या जीपला ट्रकने धडक देवून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रांताधिकाऱ्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी बेलवंडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११४/२०१६ भा.दं.वि कलम ३०७, ३५३, ३४१ प्रमाणे दि.१४/०६/२०१६ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस अटकपुर्व जामीन मिळाला असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहराच्या मध्यवस्तीत सुरु असलेला अनैतिक व्यापार**

**(२८) ७६९४२ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) शहराच्या मध्यवस्तीत सर्रासपणे सुरु असलेल्या कुंटणखान्यावर पोलिसांच्या पथकाने दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी छापा टाकून अनैतिक देहव्यापार करणाऱ्या नगर व दौंड येथील दोन तरुणांसह दोन महिलांवर "पिटा" अंतर्गत कारवाई करण्यात आल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी संबंधितांविरुध्द गुन्हा नोंदवून दोषीं विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५८९/२०१६ स्त्रियांचा अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ३, ४, ५, ८ प्रमाणे ४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**अहमदनगर शहरातील सर्जेपूरा "सी-लाई" या कापड दुकानातील महिलांच्या ड्रेसिंग रुम मध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावून त्याचा दुरुपयोग करण्यात आल्याबाबत**

**(२९) ७६९४६ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरातील सर्जेपूरा "सी-लाई" या कापड दुकानातील महिलांच्या ड्रेसिंग रुम मध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावून त्याचा दुरुपयोग केल्याची धक्कादायक घटना घडल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिसांनी उक्त प्रकरणी दुकान मालकाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२७/२०१६ भा.दं.वि. कलम ३५४ (क), ३२३, ५०६, बालकांचे लैगिंक आत्याचारापासून संरक्षण कायदा कलम ७ व ८ प्रमाणे दि. २९/१२/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात दुकानातील मॅनेजर व इतर १ व्यक्ती दोषी आढळून आल्याने त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीत झालेले फुटेज तपासकामी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई येथे पाठविण्यात आलेले आहेत. परंतू त्याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर गुन्हा तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**लोहारे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या ग्रामसेवकास मारहाण केल्याबाबत**

**(३०) ७७३०२ (२१-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेले ग्रामसेवक प्रदिप आसने यांनी जुन्या शौचालयाचे बोगस अनुदान काढून देण्यास नकार दिल्याने त्यांना दिलीप सोमवंशी यांनी लाथाबुक्क्याने व खुर्चीने बेदम मारहाण केल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मारहाण करणाऱ्या व्यक्तीला पोलीसांनी अटक केली आहे काय, असल्यास, त्याच्या विरुध्द कोणता गुन्हा नोंदविण्यात आला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १९०/२०१६ भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, प्रमाणे दि.१६/१२/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) होय.

सदर गुन्ह्यातील आरोपीस दि.०५/०१/२०१७ रोजी अटक करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**माळेगाव (ता.सावनेर, जि.नागपूर) नजीक पंधराखेडी येथील श्रीनाथ रासायनिक कंपनीमध्ये एका मजुराचा हात मशिनमध्ये अडकल्याने कापावा लागल्याबाबत.**

**(३१) ७७३१४ (२१-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळेगाव (ता.सावनेर, जि.नागपूर) नजीक पंधराखेडी येथील श्रीनाथ रासायनिक कंपनीमध्ये दिनांक १० डिसेंबर २०१६ रोजी वा त्या सुमारास एका मजुराचा हात मशिनमध्ये अडकूनही सदर प्लांट बंद न करता, आठ तासानंतर व्यवस्थापकाने प्लांट बंद करुन, मजुराचा हात काढल्याने तो हात कापावा लागल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही घटना ग्रामस्थांना कळल्यानंतर त्यांनी कंपनीचे व्यवस्थापक सुरज पटेल व मालकाविरुध्द गुन्हे दाखल करुन अटक करण्याची मागणी केली व पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रम कदम, तहसिलदार गणवीर यांनी संतप्त जमावाची समजुत काढून जखमीला हॉस्पिटलमध्ये पोहोचवले, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मजुराला नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच श्रीनाथ रासायनिक कंपनीचे मालक व व्यवस्थापक सुरज पटेल यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-०७-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.

मे.श्रीनाथ फाईन केम प्रा. लि., मालेगाव, ता.सावनेर, जि.नागपूर या कारखान्यात दि.११/१२/२०१६ रोजी पहाटे ०४:०० वा. चे सुमारास कारखान्यात काम करित असतांना श्री.सुरेन्द्र गडे या कामगाराचा डावा हात मशीनच्या रोटर बॉक्समध्ये फसला. अपघातानंतर लगेच मशीन बंद करण्यात आली. त्यानंतर सकाळी ११.०० वा. कामगाराचा फसलेला हात मशीनमधून काढण्यात आला. त्यास त्वरित नागपूर येथील दवाखान्यात भरती करण्यात आले होते.

(२) सदर अपघाताची माहिती कारखाना व्यवस्थापनाने फोनवरून पोलीस स्टेशन, सावनेर यांना दि.११/१२/२०१६ रोजी सकाळी ७:३० वा. च्या सुमारास दिल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. जखमी कामगाराच्या वडीलांनी केलेल्या फिर्यादीवरून पोलीस विभागातर्फे कंपनीचे व्यवस्थापक सुरज पटेल व मालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने चौकशीअंती कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत कलम २१(१) (iv) (c) व कलम ७ A (२) (a) चा भंग केल्याप्रकरणी कारखान्याच्या भोगवटादार विरुध्द अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात दि.०८/०३/२०१७ रोजी खटला दाखल केला आहे.

जखमी कामगारावरील वैद्यकिय खर्च रु.५०,७६२/- व्यवस्थापनाने केला आहे व रु.५०,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे.

पोलीस विभागामार्फत देखील कंपनीचे व्यवस्थापक व मालकाविरुध्द गुन्हा दाखल करून सावनेर येथील न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पन्हाळा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) पणुत्रे पेयजल योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची फेरचौकशी करण्याबाबत

**(३२) ७७८९८ (२१-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) पणुत्रे पेयजल योजनेत झालेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊनही कारवाईस टाळाटाळ केल्याबद्दल जिल्हा न्यायालयाने शाहूपूरी पोलिसांना फेरचौकशी करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी फेरचौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७)** :(१) व (२) सदर प्रकरणी मा.जिल्हा न्यायालयाकडून फेरचौकशीचा आदेश झालेला नसून मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांनी पोलीस ठाणेस सीआरपीसी १५६ (३) प्रमाणे तपास करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले आहेत.

तथापि, मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी उक्त आदेशास स्थगित दिली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील शर्तीच्या जमीन व्यवहारप्रकरणी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर चुकीच्या पद्धतीने दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत**

**(३३) ७८०१८ (२१-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) येथे शर्तीच्या जमीन व्यवहारप्रकरणी लाचलुचपत खात्याने महसूल अधिकाऱ्यांविरुद्ध चुकीचे गुन्हे दाखल केल्याच्या कारणावरून महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी दिनांक ६ व ७ जानेवारी, २०१७ रोजी काम बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील प्रश्न भाग (१) मधील शर्तीच्या जमीनी शासनाला जमा करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल व्हावेत म्हणून तक्रारदाराने मालेगांव (जि.नाशिक) न्यायालयात दाखल केलेला दावा न्यायालयाने फेटाळून अशाप्रकारे गुन्हे दाखल करता येत नसल्याबाबत दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी निर्णय दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाचलुचपत विभागाकडून महसूल अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल केलेले चुकीचे गुन्हे मागे घेण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे. नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि.६ जानेवारी, २०१७ रोजी काम बंद आंदोलन केले व दि.७ जानेवारी, २०१७ रोजी काळ्या फिती लावून कामकाज करण्यात आले आहे.

(२) होय, नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शर्तीच्या जमीनी अपर जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये शासनाला जमा करण्यात आलेल्या आहेत.

(३) सदर प्रकरणांत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल व्हावेत म्हणुन तक्रारदाराने मा.विशेष न्यायालय तथा अतिरिक्त सत्र न्यायालय, मालेगांव यांच्या न्यायालयात सीआरपीसी १५६(३) प्रमाणे तक्रार दाखल करून घेण्याबाबत अर्ज केला होता मात्र सीआरपीसी १५६(३) प्रमाणे तक्रार दाखल करून घेण्याचे अधिकार विशेष न्यायालयास नसल्याने सदर अर्जाची दखल घेऊ शकत नसल्याचे नमूद केले आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी चुकीचे गुन्हे दाखल झालेले नाहीत.

---

**बांधकाम तसेच घरेलू कामगारांची नोंदणी करून जिल्हास्तरावर**
**स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबत**

**(३४) ७८०२७ (२१-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांधकाम तसेच घरेलू कामगारांची नोंदणी करून त्यांना कल्याणकारी योजनांचा प्रभावीपणे लाभ देण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) नोंदणीकृत पात्र बांधकाम कामगारांस जलद गतीने लाभ वाटप करण्याकरिता तसेच मंडळाचे कामकाज पाहण्यासाठी दिनांक १८.६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हा कार्यालयास बाह्य यंत्रणेद्वारे, १ लिपिक, १ डेटा एन्ट्री ऑपरेटर, १ कनिष्ठ लेखापाल तसेच विभागीय कार्यालयासाठी १ लिपिक, १ डेटा एन्ट्री ऑपरेटर, १ कनिष्ठ लेखापाल आणि मुंबई येथील कार्यालयासाठी ३ लिपिक, ३ डेटा एन्ट्री ऑपरेटर व ३ कनिष्ठ लेखापाल अशी पदे कंत्राटी पध्दतीवर भरण्यात आली आहे. तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासाठी स्वतंत्र पूर्ण वेळ अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळासाठी ४८ पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे शहर, रा.मोहाडी उपनगर येथील कुमारी निकिता गावडे हिच्या**
**हत्येची सीआयडी मार्फत चौकशी करण्याबाबत**

**(३५) ७८५४९ (२१-०४-२०१७). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहर, रा.मोहाडी उपनगर येथील कुमारी निकिता गावडे हिच्या निघृण हत्येची सी आय डी मार्फत चौकशी करण्याचे आदेश होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी करुनही अदयापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनस्तरावर तातडीने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) व (२) उक्त प्रकरणी शासनाचे पत्र क्र. सी.आय.डी. ०११७/प्र.क्र. ४७/पोल-१२ दि. २५/०१/२०१७ अन्वये अपर पोलीस महासंचालक, रा.गु.अ.विभाग यांना चौकशी करण्याचे आदेश दिले असून त्यानुसार गुन्हे अन्वेषण विभागामार्फत तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## दिंडोरी तालुक्यातील (जि.नाशिक) सोनगांव येथील मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी सुरु असलेली चौकशी

**(३६) ७८५७५ (२१-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी तालुक्यातील (जि.नाशिक) सोनगांव शिवारातील मळ्याजवळ दिनांक २० मार्च, २०१६ रोजी चौघा नराधमानी केलेल्या बलात्काराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बलात्कार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :**(१) होय.

(२) सदर घटनेबाबत आरोपीविरुध्द दिंडोरी पोलीस स्टेशन गुरनं.४५/२०१६ भादवी कलम ३७६(ड), ५०६ व लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा कलम ४, १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील चारही आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर केसचे सुनावणी अंती मा.न्यायालयाने आरोपींना प्रत्येकी २० वर्षे सक्त मजूरी व रु.५०००/- दंड व दंड न भरल्यास ३ वर्षे सक्तमजूरी शिक्षा दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बदलापूर (जि.ठाणे) येथील सानेवाडी परिसरातील सुशिक्षित महिला व तरुणींना शासन मान्यताप्राप्त व्यवसाय प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली केल्याबाबत फसवणूक

**(३७) ७८५९१ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील सानेवाडी परिसरातील सुशिक्षित १०० ते १५० महिला व तरुणींना शासन मान्यताप्राप्त व्यवसाय प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली सुनिल घडवले व त्यांची पत्नी सुप्रिया घडवले या दांपत्याने व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू करून लाखो रुपयांना फसवल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय व त्यानुसार संबंधीत महिलांची फसवणूक करणाऱ्या आरोपींना अटक करुन पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, बदलापूर पश्चिम पोलीस ठाणे हद्दीत माहे १८ जुलै, २०१६ ते आजपावेतो वाडीलाल टॉवर, देवधरवाडा, सानेवाडी, बदलापूर पश्चिम या ठिकाणी " फक्त मुली/ महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना" या ट्रस्टचे संचालक १) सुनिल शांताराम घडवले २) सुप्रिया सुनिल घडवले यांनी "फक्त मुली /महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण योजने " बाबत जाहिराती आणि पॅम्पलेट छापून व ते महाराष्ट्र मान्यता प्राप्त असून त्याचा नोंदणी क्र." महाराष्ट्र राज्य/एफ/२०१९७/टिएचएन" असा असल्याचे भासवले व नमूद ठिकाणी विविध कोर्स करीता फिर्यादी कडून ३२,६००/-रु. स्विकारुन तसेच इतर १०० ते १५० प्रवेशित मुली/ महिलांकडून विविध कोर्स करीता सूमारे ५ ते ६ लाख रुपये स्विकारुन नियोजीत कोर्सचे प्रशिक्षण न देता तसेच भरलेले पैसे परत न देता फिर्यादी व इतर मुली/ महिला यांची फसवणूक केली तसेच ट्रस्ट मध्ये असलेले १५ कर्मचाऱ्यांना देखील त्यांचा सहा महिन्यांचा पगार न देता त्यांची देखील फसवणूक केली म्हणून ट्रस्टचे संचालक यांचे विरोधात बदलापुर पश्चिम पोलीस ठाणे गु.र.क्र.०३/२०१७ भादंवि कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

आरोपीतांवर मा.न्यायालयात दिनांक १७.०५.२०१७ रोजी दोषारोपपत्र सादर केले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पाचशे आणि एक हजारांच्या जुन्या नोटा २५ टक्क्यांच्या मोबदल्यावर बदलण्यासाठी आलेल्या सात जणांना अटक केल्याबाबत**

**(३८) ७८६१९ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पाचशे आणि एक हजारांच्या जुन्या नोटा २५ टक्क्यांच्या मोबदल्यावर बदलण्यासाठी आलेल्या सात जणांना अटक करून त्यांच्याकडून ५५ लाखांच्या जुन्या नोटा जप्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू प्रकरणी गुप्त माहितीनुसार एएचटीसी पथकाने दोन पंचासह, मारुती वॅगनार कार नं.एमएच ४६-टिएल-२५३ मधील चालकासह ३ इसम व स्विफ्ट डिझायर कार नं. एमएच-०८-आर-४६७२ मधील चालकासह एक महिला व दोन इसम यांना ताब्यात घेवून, नमूद इसमांची व वाहनांची पंचासमक्ष झडती पंचनामा केला असता, १) वॅगनार कारमध्ये एकुण २९,६७,५००/- रुपये त्यामध्ये १०००/- दराच्या भारतीय चलनातील बंद झालेल्या ५२८ नोटा व ५००/- रु. दराच्या भारतीय चलनातील बंद झालेल्या ४८७९ नोटा जप्त केल्या २) स्विफ्ट डिझायर कारमधून एकुण २४,९४,५००/-रुपये त्यामध्ये १०००/- दराच्या भारतीय चलनातील बंद झालेल्या ७९५ नोटा व ५००/- रु.दराच्या भारतीय चलनातील बंद झालेल्या ३३९९ नोटा जप्त केल्या. अशा एकूण ५४, ६२,००/- रुपयांच्या नोटा वरील नमूद वाहनासह जप्त करून, वर्तकनगर पोलीस ठाणे येथे सी.आर.पी.सी. कलम ४१ (१) (ड) प्रमाणे दिनांक ११.०१.२०१७ रोजी गु.र.क्र. ५३/२३:१० वाजता नोंद घेण्यात येवून, यातील ७ आरोपी विरुद्ध आयकर विभाग, ठाणे मार्फत अधिक तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत

**(३९) ७८६७४ (२१-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याचा ठराव दिनांक १२ मे, २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी अद्‌याप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) राज्य मंत्रीमंडळाच्या दि.१२/५/२०१५ रोजीच्या बैठकीत कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शासनाने मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि.१७/७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिवा रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे मार्गिकेवर सात मीटर रुळाचा तुकडा ठेवून घातपात घडविण्याचा प्रकार निदर्शनास आल्याबाबत

**(४०) ७८८१७ (२१-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा रेल्वे स्थानकानजीक रेल्वे मार्गिकेवर सात मीटर रुळाचा तुकडा ठेवून दि. २५ जानेवारी २०१७ रोजी रात्रीच्या समयी घातपात घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दखल घेवून शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार घातपाताच्या घटना रोखण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

परंतु त्यात घातपात घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला हे अद्याप निष्पन्न झालेले नाही.

(२) वरील प्रकरणी पोलीस तपासावर असुन याप्रकरणी ठोस कारवाई म्हणून पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थींना पोलीस महासंचालकांचे आदेशान्वये रेल्वेमार्गाचे निरीक्षण व तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून रेल्वे पोलीसांची हद्द व कामकाज, ट्रॅक पेट्रोलिंग, घडणारे गुन्हे, अपघाती मृत्यू, रेल्वे हद्दीत बॉम्बस्फोटच्या घटना, रेल्वे कायदा व रेल्वे सुरक्षा बल कायदा संदर्भात प्रशिक्षण देवून रेल्वे पोलीसांच्या सोबत ट्रॅक पेट्रोलिंगकामी पाठविण्यात आले आहे. याअनुषंगाने दि. १८.०२.२०१७ व दि. ३.३.२०१७ रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात राज्यातील व इतर राज्यातील रेल्वे पोलीसांचे वरिष्ठ अधिकारी यांची समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरहू बैठकीत सुरक्षा संदर्भातील घटना, आवश्यक सुरक्षा उपाययोजना, रेल्वेतील गुन्हे व गुन्हेगारांच्या माहितीचे आदानप्रदान बाबत चर्चा करण्यात आली.

अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ शकेल अशी संभाव्य ठिकाणे शोधून काढून विविध सेक्टर मध्ये ट्रॅक पेट्रोलिंग करिता रोटेशन पध्दतीने कर्मचारी नेमण्यात आले असून यावर पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी देखरेख करित आहेत.

लोहमार्ग पोलीस ठाण्याचे अधिकारी, गुन्हे शाखेचे अधिकारी हे संबंधित शहर पोलीसांच्या सतत संपर्कात असून सातत्याने नमूद गुन्हे उघडकीस आणण्याचे व अशा घटनांना प्रतिबंध करण्याचे प्रयत्न चालू असून रेल्वे सुरक्षा बलाकडूनही तपास करणे तसेच योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील सेलू, पाथरी, गंगाखेड पाथरी आदि शहरामध्ये शस्त्रांचा धाक दाखवून घरफोडीच्या घटना घडल्याबाबत**

**(४१) ७९२८५ (२१-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील सेलू, पाथरी, गंगाखेड पाथरी आदि शहरामध्ये शस्त्रांचा धाक दाखवून घरफोडीच्या अनेक घटना घडल्या असून घरफोडीत चोरटयांनी केलेल्या धुक्काबुक्कीत पती-पत्नीसह पोलिस निरिक्षक जखमी झाले असून दोन लाख रुपयांचा ऐवज चोरटयांनी पळविल्याचे तसेच पाथरी शहरातील गुलजारनगर भागात दरोडेखोरांनी शस्त्रांचा धाक दाखवून तिघांना मारहाण करुन दोन लाख रुपयांचा मुद्देमाल लुटल्याचेही माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात चोरी व दरोड्याचे वाढलेल्या प्रमाणामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) व (२) परभणी जिल्हयात सन २०१७ मध्ये पाथरी, सेलु व गंगाखेड पोलीस स्टेशन हद्दीत दरोड्याच्या २ घटना व जबरी चोरीची १ घटना अशा एकूण ३ घटना घडल्या आहेत.

यामध्ये गुलजारनगर, पाथरी येथे फिर्यादीस धाक दाखवून एकूण २,०००००/- रुपयाचा ऐवज चोरीला गेल्या प्रकरणी पाथरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २४/२०१७ भा.दं.वि. कलम ३९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयातील आरोपींना अटक करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

हसमुख कॉलनी, सेलू येथे पती-पत्नीला मारहाण करुन एकूण १,०४,२००/- रुपयांचा ऐवज चोरुन नेला तसेच, सदर चोरट्यांनी सातोना रोड, सेलू येथे पोलीस निरीक्षक यांना मारहाण केल्याप्रकरणी सेलू पोलीस स्टेशन गु.र.नं. २४/२०१७ भा.दं.वि. कलम ३९७, ३९५, ३९४, ४५८, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करुन १ आरोपीस अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हा उर्वरीत आरोपी अटक करण्यावर तपासावर आहे.

तसेच, जबरी चोरीचा गंगाखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२/२०१७ भा.दं.वि. कलम ३९४, ४५७, ३८०. अन्वये १ गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**गोरेगांव (मुंबई) परिसरातील आरे सब पोलीस ठाण्याच्या हद्दीत तरुणांची हत्या करण्यात येऊन त्याचा मृतदेह धडापासून वेगळा करण्यात आल्याबाबत**

**(४२) ७९४०६ (२१-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव (मुंबई) परिसरातील आरे सब पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोरेगाव पूर्वेकडील दिंडोशी येथे पद्यवती सोसायटीत राहणा-या ब्रॅण्डन गोन्साल्विस या २२ वर्षीय तरुणांची हत्या करण्यात येऊन त्याचा मृतदेह धडापासून वेगळा करण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मृत तरुणांच्या मानेवर एकच मोठा वार असुन संपूर्ण शरीरावर कोणतीही जखम नसल्याचे पोलीसांनी सांगितले असुन ही घटना नरबळीचा असल्याचा दाट संशय असुन या प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन आवश्यक कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१) होय, सदर घटनेची माहिती दिनांक २२.१२.२०१६ रोजी मिळाली आहे.
(२) सदरहू मृत तरुणाच्या मानेवर धारदार शस्त्राने अज्ञात इसमानी वार करुन त्याचे मुंडके धडापासून वेगळे केलेले असून त्याच्या कपाळावर व हाताचे पंजावर अधिक चिन्ह धारदार शस्त्राने कोरण्यात आलेले आहे. तसेच नमुद घटना ही नरबळी असल्याबाबतचे कोणतेही पूरावे आढळून आलेले नाही.
याबाबत आरे पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१५८/१६ भादंवि कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल असून गुन्हा तपासाधिन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथील मौलाना आझाद चौक येथे**
**बस व ट्रक यांचा झालेला अपघात**

**(४३) ७९६१२ (२०-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड येथील मौलाना आझाद चौक येथे बस समोरुन येणा-या ट्रकवर आदळल्याने बसमधील १६ प्रवाशी जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्यासोबतच जखमी प्रवाशांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी सिल्लोड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०७/२०१७ भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ४२७ प्रमाणे दोषी बस चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्यात आरोपीस अटक करुन त्याच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी जखमींना अद्याप आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील दुर्घटनांची चौकशी करण्याबाबत**

**(४४) ७९६३२ (२१-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर पोलीस ठाण्यातंर्गत कायगाव येथे मोटर सायकलवरुन प्रवास करणा-या अनिता एडके या महिलेचा अज्ञात टेम्पोने धडक दिल्याने मृत्यु झाला असून दोनजण गंभीर जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अजिंठा पोलीस ठाण्यातंर्गत गोलेगांव व पानवडोद दरम्यान जीप उलटून जीप चालकाचा मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त दोन्ही दुर्घटनांची चौकशी केली आहे काय व त्यात दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्यासोबतच मृत्यु पावलेल्याच्या कुटूंबास कोणती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**१) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी गंगापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ०८/२०१७ भा.दं.वि.कलम २७९, ३०४(अ), ३३७, सह कलम १३४/१७७ मो.वा.का. प्रमाणे दि. १०/०१/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) होय.
सदर अपघात हा जीप चालकाच्या चुकीमुळे झाला असल्याने त्यांच्या विरुध्द अजिंठा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १८/२०१७ भा.दं.वि. कलम २७९, ३०४, (अ) ३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) गु.र.नं. ०८/२०१७ मधील अपघातातील ट्रक अद्याप निष्पन्न झाला नसून गुन्हा तपासावर प्रलंबित आहे. त्यातील मयत महिलेच्या नातेवाईकांना अपघात विमा मिळण्याकरिता सर्व कागदपत्र अवगत करुन देण्यात आलेली आहेत.
गु.र.नं. १८/२०१७ मधील अपघातामध्ये चालक हा मयत झाला असून सदर अपघात हा चालकाच्या चुकीमुळे घडला असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**वसई पूर्वेकडील (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमधील बालकामगारांची मानवी वाहतूक प्रतिबंधात्मक शाखेने सुटका केल्याबाबत**

**(४५) *८०५३४* (२१-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई पूर्वेकडील (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम करणा-या १८ बाल कामगारांची दिनांक १७ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास मानवी वाहतूक प्रतिबंधात्मक शाखेने सुटका केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुटका करण्यात आलेल्या बाल कामगारांमध्ये एकूण किती मुले-मुलींचा समावेश आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे

(२) सुटका करण्यात आलेल्या बालकामगारांमध्ये ०८ मुली व १० मुलांचा समावेश होता.

(३) वसई पूर्वेकडील औद्योगिक क्षेत्रातील कंपण्यांमध्ये बेकायदेशिर बालकामगार कामाकरिता ठेवले जात असल्याची माहिती मिळाल्याने श्रीपाल इंडस्ट्रिअल इस्टेट या कंपनीमध्ये धाड टाकून १८ बालकामगारांची सुटका करण्यात आली आहे. याबाबत वालीव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१७/२०१७, भांदविसं कलम ३७४, ३४ सह ज्युवेनिएल जस्टीस ॲक्ट २०१५ चे कलम ७९ अन्वये ५ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात मिळून आलेल्या १८ बालकामगार मुलां-मुलींना मा.अध्यक्षा, बालकल्याण समिती, ठाणे-उल्हासनगर यांचेकडे हजर केले असता त्यांना योग्य त्या बाँन्डवर पालकांचे ताब्यात दिलेले आहे. गुन्ह्यातील ४ आरोपींना मा. न्यायालयाने जामीन दिला असून एका आरोपीस अटक पूर्व जामीन मंजूर आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) शहरात घरफोडीच्या प्रकरणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(४६) *८१५४१* (२१-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) शहरात घरफोडीच्या व चोरीच्या प्रकरणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण पसरले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरफोड्या व चोरीचे प्रकरणे थांबवण्यासाठी पोलिसांनी रात्रीच्या वेळी गस्त घालावी अशी मागणी नागरीक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरफोड्या व चोरीच्या घटना थांबवण्यासाठी रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

तथापि, भोर (जि.पुणे) शहरात माहे जानेवारी २०१६ ते एप्रिल २०१६ व जानेवारी २०१७ ते एप्रिल २०१७ या कालावधीत दाखल घर फोडी व चोरीच्या गुन्ह्याची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | वर्ष | घरफोडी | | चोरी | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड |
| १ | जानेवारी ते एप्रिल २०१६ | ३ | ० | १ | ० |
| २ | जानेवारी ते एप्रिल २०१७ | २ | ० | ९ | १ |

वरील प्रमाणे सन २०१६ वर्षाशी सन २०१७ वर्षाची तुलना करता सन २०१७ मध्ये घर फोडीमध्ये (-१) ने घट व चोरीमध्ये (+८) ने वाढ झाल्याचे दिसून येते.
परंतु सदर स्थानिक पोलीस स्टेशनकडून भोर शहर व ग्रामीण हद्दीत दररोज रात्रगस्त नेमण्यात येते व पेट्रोलिंग नेमन्यात येत.
(३) भोर शहर व ग्रामीण हद्दीत स्थानिक पोलीसांकडून दररोज रात्रगस्त व पेट्रोलिंग नेमन्यात येते त्याकरिता ग्रामसुरक्षा दल व पोलीस मित्रांची मदत घेतली जाते. रात्रगस्त दरम्यान पोलीस स्टेशन हद्दीतील बँका, एटीएम, सराफी दुकाने, बसस्थानके, पेट्रोलपंप अशा महत्वाच्या ठिकाणांना भेटी दिल्या जातात. तसेच अचानक नाकाबंदीचे आयोजन करुन संशयित वाहनांची तपासणी केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ४६ सहकारी साखर कारखान्यांची बेकायदा विक्री करण्यात आल्याबाबत**

**(४७) ८२१७१ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४६ सहकारी साखर कारखान्यांची सन २००६ ते २०१४ या कालावधीत बेकायदा विक्री करून गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब ज्येष्ठ समाजसेवक श्री अण्णा हजारे यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे उपजिल्हा माहिती कार्यालय मंजूरी करणेबाबत**

**(४८) ८२४१९ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) येथे कर्नाटक व शासनाच्या विविध प्रादेशिक भाषांचे वृत्तपत्र कार्यालय व स्थानिक वृत्तपत्रांची संख्या लक्षात घेता उदगीर तालुक्यासह सिमाभागातील मराठी भाषीकांसाठी वृत्तपत्रांचे उपजिल्हा माहिती कार्यालय मंजूर करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जूलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपजिल्हा माहिती कार्यालयासाठी लागणाऱ्या जागेची शासन स्तरावर पाहणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालय मंजूर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुर्गळवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे मोठ्या प्रमाणावर**
**अवैध दारुविक्री सुरु असल्याबाबत**

**(४९) ८२८४२ (२०-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुर्गळवाडी (ता.कोरेगाव, जि.सातारा) येथे मोठया प्रमाणावर अवैध दारुविक्री व अवैध व्यवसाय सुरु असून अनेक तरुण व ग्रामस्थ व्यसनाच्या आहारी जाऊन अनेकांचे संसार उद्‌ध्वस्त झाल्यामुळे तेथील महिलांनी मोर्चा काढून सदर अवैध व्यवसाय बंद करण्याच्या मागणीचे निवेदन रहिमतपूर पोलीस ठाण्यात दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी दखल घेऊन अवैध दारु विक्री व व्यवसाय बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७)** :(१) सदर प्रकरणी दुर्गळवाडी येथील महिलांनी गावातील अवैध दारु विक्री बंद होणेबाबत दि. ०२/०१/२०१७ रोजी रहिमतपूर पोलीस ठाणेस निवेदन दिलेले होते. सदरबाबत पोलीस ठाणेस मोर्चा काढणेत आलेला नव्हता.

(२) सदर प्रकरणी निवेदन देण्यापूर्वीच दि. २२/१२/२०१६ रोजी दुर्गळवाडी येथील अवैध दारु विक्री करणाऱ्या १ आरोपीविरुध्द रहिमतपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १६१/२०१६ मु.प्रोव्ही ॲक्ट कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस अटक करुन त्याच्याकडून ७००/- रुपये किंमतीची दारु जप्त करण्यात आलेली आहे. तसेच आरोपी विरुध्द मा. न्यायालयात दोषरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर गावामध्ये अवैध धंद्याबाबत माहिती घेवून छापे टाकले असता अवैध धंदे चालू असल्याचे आढळून आलेले नाही. तरीपण सदर गावामध्ये अवैध धंद्याबाबात गोपनिय बातमीदारा मार्फत माहिती प्राप्त करुन अवैध धंद्याचे उच्चाटन करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मौजे सुलतानपूर (ता.माढा, जि.सोलापूर) या महसुली गावाचे राहुलनगर असे नामकरण करणेबाबत**

**(५०) ८४०२० (१२-०४-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सुलतानपूर (ता.माढा, जि.सोलापूर) येथील पोलिस जवान राहुल सुभाष शिंदे हे २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये आपले कर्तव्य बजावत असताना शहीद झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहीद राहुल सुभाष शिंदे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुलतानपूर या गावाचे 'राहुलनगर' असे नामकरण करण्याबाबत तेथील ग्रामस्थ, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी सन २०१० पासून शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गावाचे राहुलनगर असे नामकरण करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करत आहे तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७)** :(१) व (२) होय. याबाबत सुलतानपूर या गावाचे "राहूलनगर" असे नामकरण करण्याबाबत दिनांक २.१.२००९ च्या जिल्हापरिषदेच्या ठरावाद्वारे मागणी केली आहे. तसेच मा.विधानसभा सदस्य (माढा), ता.माढा, जि.सोलापूर यांनी त्यांच्या दिनांक १३.१२.२०१६ च्या पत्रान्वये नामकरणाबाबत मागणी केली आहे.

(३), (४) व (५) गावाचे नांव बदलण्यासंर्भात केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने त्यांचे पत्र क्रमांक १३०/५३ दिनांक ११ सप्टेंबर १९५३ अन्वये मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी, छाननी करुन विभागीय आयुक्तांच्या शिफारशीने शासनाकडे प्रस्ताव सादर करतात. सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्याची कार्यवाही करण्यात येते. प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, पूणे यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये मौजे सुलतानपूर या गावाचे नाव राहूलनगर करण्याच्या अनुषंगाने पत्रव्यवहार केलेला होता. त्याअनुषंगाने दिनांक २२ जानेवारी, २०१०, दिनांक ७ मार्च, २०१७ व दिनांक ९ मे, २०१७ च्या शासनपत्रान्वये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, पूणे यांना कळविले आहे. प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.